# होमिओपथी : माणसातील रोगावर नव्हे, रोगातील माणसावर इलाज!

होमिओपॅथीचं औषध म्हणजे साबुदाण्याच्या आकाराच्या गोळ्या. इतर कोणत्याही उपचारपध्दतीनं बरं झालं नाही की मग 'शेवटचा उपाय' म्हणून या डॉक्टरांकडे जायचं, तेही बरं होईलच याची ग्यारण्टी नाही असा भाव चेहऱ्यावर घेऊन! शिवाय होमिओपथी म्हणजे महाग असणार. एका सिटींगचे भरपूर पैसे घेतात. श्रीमंत माणसांचीच कामं ती! मुख्य म्हणजे होमिओपथीने रूग्णाला बरा व्हायला प्रचंड वेळ लागतो. त्यापेक्षा आपला कोपऱ्यावरचा अॅलोपथी डॉक्टर बरा. तो लगेच इंजेक्शन देतो, सिरप देतो की रोग पळालाच!



### होमिओपथीबद्दल गैरसमजच खूप.

असे अनेक गैरसमज घेऊन आपण होमिओपथी या जुन्या उपचारपध्दतीकडे बघतो. अॅलोपथी डॉक्टरांपेक्षा हे डॉक्टर कमी शिकलेले, पोस्टल कोर्स वगैरे केलेले आहेत असे बेधडक मानतो. या सगळ्या गोष्टी आपण कोणताही विचार न करता केवळ सरावाने, इतर सांगतात म्हणून खऱ्या मानतो. प्रत्यक्ष होमिओपथी डॉक्टरला भेटून, त्याच्याशी बोलून, माहिती घेऊन त्याच्या मूळाशी जाऊन सत्य बाहेर आणायच्या फंदात कुणी पडत नाही. म्हणून चेंबूरला स्वत:चे प्रेडिक्टीव्ह होमिओपथीक क्लिनीक चालवणाऱ्या, एम.डी.असणाऱ्या मानसिक असंतुलन या विषयावर प्रबंध लिहिणाऱ्या आणि दहा-बारा वर्षांहून अधिक काळ होमिओपथी उपचार करून शेकडो रूग्णांचे जीवन सुखमय करणाऱ्या डॉ.अनिता संजय साळुंखे यांची वार्तादीपने थेट भेट घेऊन माहिती घेतली. त्यांनी सादर केलेली कागदपत्रं, फोटो, रूग्णांच्या प्रगतीबाबतच्या फाईल्स पाहिल्या आणि यातून मग उलगडा झाला की अज्ञानापोटी व अधुऱ्या माहितीमुळे इतक्या परिणामकारक उपचारपध्दतीकडे मोठ्या प्रमाणावरील जनमानसाचं कसं दुर्लक्ष झालं आहे ते!

डॉ.अनिता साळुंखे सांगतात, शरीराप्रमाणेच मनावरही या पध्दतीत उपचार केला जातो.

१९८९ पासून होमिओपथीची प्रॅक्टीस करणाऱ्या डॉ.अनिता साळुंखे सांगतात की, वैद्यकविश्वाची ही शाखा कदाचित भारतात तितकीशी पुढे नाही. पण एएफएसी होमिओपॅथीक सेन्टर वा संस्थेद्वारे त्यांनी जर्मनी, अमेरिका, रशिया, बल्गेरिया, इस्त्रायल येथील एन.डी.डॉक्टरांनाही होमिओपथीचे शिक्षण दिलंय. न्यूजर्सी येथे स्वत: जाऊन झाल्यावर त्यांनी होमिओपथीची अखिल भारतीय कार्यशाळा सुरु केली. स्वत:चे वेब क्लिनीकही सुरु केलंय. ईमेलद्वारा रूग्णांवर इलाज करण्याचे महत्कार्य त्या करतात. सदर मुलाखत सुरु असताना नवी मुंबईमधील तुर्भे गावातील पंचेचाळीशीच्या सद्गृहस्थाची माहिती त्या समोर बसवून घेत होत्या. ते करताना केवळ वय, वजन, उंची, रक्त, लघवी, थुंकी, रक्तदान, इसीजी असल्या केवळ तांत्रिक व बाह्य बाबतीत त्यांना स्वरस नव्हता. त्यांनी त्या रूग्णाची सांसारिक स्थिती, अर्थव्यवस्था, मित्रपरिवार, कामातील ताणतणाव, शेजारपाजारी यांच्याशी संबंध यांची इत्यंभूत माहिती अगदी खेळीमेळीच्या वातावरणात घेतली व 'मी तुम्हाला एका महिन्यात नॉर्मल बनवीन' असे त्यांनी सांगूनही टाकले. हे रूग्णाच्या मनात शिरून मानसोपचाराचं तंत्र ही होमिओपथी शिकवते. मन दुबळं असेल तर शरीरावर रोगाचा हमला होणारच! मनाचा ताबा, राग, लोभ, चिंता, दु:ख यांनी घेतला तर त्याचा अपरिहार्य परिणाम शरीरावर होणारच. असा मन व शरीराचा परस्परसंबंध आहे. या मनावरही उपचार करण्याचं महान कार्य ती होमिओपथीची साबुदाण्याएवढी दिसणारी गोळी करते.



होमियोपथीवर परदेशात व्याख्यान देणाऱ्या डॉ.अनिता संजय साळुंखे.

### वेगळेपण होमिओपथीचे!

इतर उपचारपध्दती रोगाची लक्षणे घालवतात; होमिओपथी रोगच कायमचा घालवते. अॅण्टीबायोटीक्स, कफसिरप, पेनिसीलीन यामुळे पेशंटला कदाचित इन्फेक्शन, खोकला, सांधेदुखीतून लागलीच आराम मिळेलही; पण त्याने ही दुखणी पुन्हा डोकी वर काढणारच नाहीत याची काय ग्यारंण्टी? घरात झुरळे, किटक येऊ नये म्हणून आपण औषधफवारणी करतो; पण त्याचा प्रभाव संपताच पुन्हा घर किटक, झुरळांनी भरते. अॅण्टीबायोटीक्सचं तसंच होतं. होमिओपथी ही इथे वेगळी ठरते. ती तुमच्या पूर्ण शरीरालाच रोगाविरोधात कायमचं सक्षम करते. विषाणूंनी तुमच्या अवयवांना हल्ला करून त्यांना कमजोर करावं तसं होमिओपथी काही शिल्लकच ठेवीत नाही. म्हणून या ट्रीटमेन्टला रोगातील माणसावर उपचार करणारी पध्दत म्हणतात; माणसातील रोगावर नव्हे, यातच सर्व आलं. अॅलोपथी माणसातील रोगावर इलाज करते. म्हणून तो माणूस चटकन बरा झाल्यासारखे वाटते (बरा होतोच असे नाही!) पण होमिओपथी मानवी शरीरातील दूषित घटकावर रोगाच्या मूळाशी जाऊन इलाज करते. याला वेळ लागतो. पण मग नंतर दुखणे डोके वर काढत नाही की साईड इफेक्टला तोंड द्यायची वेळ येत नाही. शिवाय अॅलोपथीचा डॉक्टर व्हायला जेवढा अवधी लागतो (साडेपाच वर्षे व एक वर्षाची सक्तीची इन्टर्नशीप) तेवढाच अवधी बीएचएम या होमिओपथी डॉक्टरच्या अभ्यासक्रमाला लागतो. त्यामुळे या उपचारपध्दतीला कुठेही कमी समजण्याचे काहीही कारण नाही.

### चेहराही बदलता येतो!

डॉ.अनिता साळुंखे होमिओपथीद्वारे व्यंग घालवतात, चेहरामोहराही बदलवू शकतात. डॉ.अनिता साळुंखे यांना १९९६ साली बेस्ट केस अॅवार्ड पुरस्कार इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ होमिओपथी फिजोशियन संस्थेद्वारे मिळाला आहे. तर एएफएसी होमिओपथिक सेन्टरने त्यांना बेस्ट फॅकल्टी अॅवार्ड देऊन गौरवले आहे. बल्गेरियासारख्या परदेशात जाऊन चर्चासत्रात व्याख्यान देणाऱ्या त्या पहिल्या भारतीय महिला होमिओपथी आहेत. त्यांचे वैशिष्ट्य म्हणजे होमिओपथीद्वारे तणावमुक्तीवर इलाज होय. या रेमेडीजच्या माध्यमातून एखाद्याची वृत्ती बदलणे, चेहरामोहरा बदलणे, विकृत वर्तन सुधारणे, व्यंगावर मात करणे, सकारात्मक विचार करायला भाग पाडणे

(उर्वरीत पान ५ वर)

## होमिओपथी वेगळी आणि गुणकारी कशी ठरते? तक्ता पहा आणि तुम्हीच ठरवा.

| नेहमीची उपचारपध्दती | होमिओपथी उपचारपध्दती |
|---|---|
| ❍ रोगाच्या लक्षणांवर, परिणामांवर उपचार करते. | ❍ रोगाच्या मूळाशी जाऊन उपचार करते. |
| ❍ विषाणू मारते. पण रोगप्रतिकारकशक्ती कुठे वाढते? | ❍ रूग्णाची रोगप्रतिकारकशक्ती वाढते व कोणत्याही संसर्गाला तोंड देण्यासाठी तो सक्षम बनतो. |
| ❍ साईड इफेक्ट म्हणून अशक्तपणा येतो, भूक जाते, उत्साह मावळतो | ❍ रूग्णाचा स्टॅमिना लगोलग वाढतो. ❍ उत्साहात वृध्दी होते. औषधे सौम्य व दक्ष निरीक्षणाखाली बनलेली म्हणून साईड इफेक्ट शून्यच. |
| ❍ शरीराचा प्रत्येक अवयव वेगळा समजून प्रत्येकावर विशेष उपचार करते. | ❍ वेगवेगळ्या अवयवांचा मिळून मानवी देह बनलाय व त्यांच्यातील सदृढ समन्वयाने तो चालतो हे ध्यानात ठेवून माणसावर इलाज करते. |